**सोलापूर विद्यापीठ**
सोलापूर- पूणे महामार्ग,केगांव
**सोलापूर- ४१३ २५५ (महाराष्ट्र)**
website : http://su.digitaluniversity.ac

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

**SOLAPUR UNIVERSITY**
SOLAPUR - Pune National Highway Kegaon,
**SOLAPUR** - 413 255.(Maharashtra)
Phone / Fax : 091-0217-2744470

Ref.No. : SOL / Date :

### विद्यापीठाच्या सुवर्णपदकात आणखी चार सुवर्णपदकाची वाढ, वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत कॅशलेस वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी विविध हॉस्पिटल्स सोबत MoU करण्यास मान्यता

**सोलापूर दि.२७** - सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची ९६ वी बैठक दि.२७/०९/२०१६ रोजी दुपारी ०१:०० वाजता व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात मा.कुलगुरु प्रा. डॉ. एन. एन. मालदार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत एकूण २५ विषयावर चर्चा झाली.

सोलापूर विद्यापीठ संकुल तसेच संलग्नित महाविद्यालयातून नियमित बी. एस्सी. मायक्रोबायोलॉजी या विषयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस सन २०१५-१६ पासून प्रत्येक वर्षी **"स्व. कु. अंजली वसंतराव बनसुडे सुवर्णपदक"** या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता ₹१,०६,०००/- प्राप्त देणगी, सोलापूर विद्यापीठ संकुल तसेच संलग्नित महाविद्यालयातून नियमित एम. कॉम. या परीक्षेमधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस सन २०१५-१६ पासून प्रत्येक वर्षी **"प्राचार्य डॉ. वसंतराव गणपत बनसुडे"** या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता ₹१,०६,०००/- प्राप्त देणगी, सोलापूर विद्यापीठ संकुल तसेच संलग्नित महाविद्यालयातून नियमित बी. ए. भाग- ३ राज्यशास्त्र (स्पेशल) या परीक्षेमधून प्रथम क्रमांक येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी / विद्यार्थिनीस सन २०१५-१६ पासून प्रत्येक वर्षी **"श्री. सुशीलकुमारजी शिंदे सुवर्णपदक"** या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता ₹१,०८,०००/- प्राप्त देणगी, सोलापूर विद्यापीठ संकुल तसेच संलग्नित महाविद्यालयातून नियमित बी. ए. हिंदी (स्पेशल) या परीक्षेमधून प्रथम क्रमांक येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस सन २०१५-१६ पासून प्रत्येक वर्षी **"कै. प्रभाकर दिगंबर शिरवळकर सुवर्णपदक"** या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता ₹१,०८,०००/- प्राप्त देणगी स्विकारुन मा. कुलगुरुंनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. यामुळे विविध विषयासाठी देण्यात येणाऱ्या ३२ सुवर्णपदकांच्या संख्येत वाढ होऊन आता ३६ इतकी झाली आहेत.

विद्यापीठ संकुलातील विद्यार्थी, वसतिगृहातील विद्यार्थी तसेच विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना तज्ञ डॉक्टरांच्या सेवा पुरविण्याच्या दृष्टीने नेत्रतज्ञ व फिजिशियन यांच्या सेवा व्हीजीटिंग तत्वावर चालू करण्यास मान्यता देण्यात आली.

विद्यापीठ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत शहरातील खाजगी स्पेशालिटी हॉस्पिटल्समध्ये कॅशलेस मेडिकल सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विविध स्पेशालिटी हॉस्पिटल्स सोबत सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

शै. वर्ष २०१६-१७ मधील १२ वी पुरवणी परीक्षेमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण होवून प्रस्तूत विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेशित झाले आहेत अशा विद्यार्थ्यांची प्रथम सत्राची २५% पेक्षा जास्त अनुपस्थिती माफ करण्यास मान्यता देण्यात आली.

सोलापूर विद्यापीठात शाहीर अमर शेख अध्यासन केंद्र सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात आली.

बैठकीचे सचिव म्हणून डॉ. देबेन्द्रनाथ मिश्रा कुलसचिव यांनी काम पाहिले.

---

संदर्भ क्र. सोविसो/सनिवि/ 9197 दिनांक:२७/०९/२०१६

**प्रेसनोट**

प्रति
**मा. संपादक**
सोलापूर शहरातील दैनिके
महोदय

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावी ही विनंती.

आपला स्नेहांकित,

DrMishra

(डॉ. देबेन्द्रनाथ मिश्रा)
कुलसचिव